बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।

कोल्हापूर महानगरपालिकेचे.

# यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर

२०३२, ए वॉर्ड, धोत्री गल्ली,
गंगावेश, कोल्हापूर - ४१६०१२
फोन : ०२३१-२५४२०८५

वेबसाईट : www.yckmccollege.ac.in
ई-मेल : yckpcollegeyahoo.in

# माहिती पत्रक

## सन २०२०-२०२१

## वरिष्ठ महाविद्यालय
(कला व वाणिज्य)

## ❋ काही महत्त्वाच्या सूचना ❋

१. प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन (Online) असल्याने विद्यार्थ्यांनी प्रथम महाविद्यालयाच्या वेबसाईटवर (Website ) प्रवेश अर्ज भरून सबमिट करावा. त्याची प्रिंटाऊट (Hard Copy) महाविद्यालयाच्या कार्यालयात जमा करावी.

२. व्यापक शैक्षणिक हिताच्या दृष्टीने महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन रद्द केले आहे. पण विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, व्यक्तिमत्त्व विकास व्हावा यासाठी विविध उपक्रम आयोजित केले जातात.

३. महाविद्यालयात गैरवर्तन अथवा असभ्य वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कडक कारवाई केली जाईल.

४. कोणत्याही बाबतीत अथवा घटनात्मक फेरबदलासाठी अंतिम अधिकार प्राचार्यांकडे असतील आणि त्यांचे निर्णय अंतिम व बंधनकारक राहतील.

५. शिवाजी विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार बी.ए./बी.कॉम. या वर्गासाठी **CBCS चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टिम** ही पद्धत शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून लागू करण्यात आली आहे.

### कॉलेजची वेळ

**सोमवार ते शनिवार : सकाळी ०७.३० ते १२.४५**

### कार्यालयाची वेळ

**सोमवार ते शनिवार : सकाळी ०८.३० ते ०३.३० पर्यंत**

**रविवार साप्ताहिक सुट्टी**

**नेहमी सूचना फलक पाहण्याची सवय ठेवावी.**

**डॉ. प्रशांत नागावकर**
प्र. प्राचार्य,
यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.)कॉलेज, कोल्हापूर.
२०३२, 'ए' वॉर्ड, धोत्री गल्ली, गंगावेश, कोल्हापूर–४१६०१२
फोन : ०२३१–२५४२०८५

# TEACHING STAFF

**Dr. P. P. Nagaonkar**
I/c. Principal
M.A. NET Ph.D.

| No. | Name of the Teacher | Subjects | Qualification |
|---|---|---|---|
| 1. | Shri.V.K. Tiwatane | Commerce | M.Com, M.Phil. |
| 2. | Shri.P.D. Toraskar | English | M. A. |
| 3. | Shri.R.S. Damugade | Economics | M.A, M.Phil. |
| 4. | Dr. P. P. Nagaonkar | Marathi | M.A. NET Ph.D. |
| 5. | Shri.P.S. Chakradhari | History | M.A. |
| 6. | Shri..D. Mude | Political Science | M. A. M.Phil. |
| 7. | Shri.S.M. Shaikh | English | M.A. |
| 8. | Dr. A. V. Paudmal | Sociology | M.A. SET, Ph.D. |
| 9. | Shri.K.S. Bhosale | Hindi | M.A. SET |
| 10. | Shri.S.T. Dhurwe | Political Science | M.A, NET |
| 11. | Smt.Dr.B.M. Patil | Sociology | M.A. B.Ed. SET, Ph.D. |
| 12. | Smt.Dr.J.M. Shivankar | Geography | M.A. NET, Ph.D. |
| 13. | Dr. S. P. Kamble | English | M.A. SET,NET Ph.D. |
| 14. | Shri. R. R. Mangale | Librarian | M.A.,M.Lib.& Inf. Sci. M.Phil., NET, SET, K-SET. |

# कॉलेजची वैशिष्टये

- अनुभवी, तज्ज्ञ व नामवंत आणि विद्यार्थी प्रिय प्राध्यापक वर्ग
- गुणवत्ता व व्यक्तिमत्त्व विकास शिक्षणावर भर आणि गुणवत्तेची कदर
- विविध कलागुणांच्या विकासासाठी विविध गुण विकास मंडळ व इतर अनेक उपक्रम
- देशी-विदेशी खेळांसाठी महानगरपालिकेची सर्व भव्य मैदाने उपलब्ध
- शिस्तीचे आवर्जून पालन
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- मुला-मुलींसाठी स्वतंत्र अभ्यासिका
- करिअर ओरेंटेड सर्टिफिकेटस् कोर्सेस
- पर्यावरण जाणीव जागृतीसाठी पारिजात निसर्ग मंडळ
- शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त ग्रंथालय सर्टिफिकेट कोर्स

**किंमत : २० रुपये**

कोल्हापूर महानगरपालिकेचे.

# यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर

## माहिती पुस्तिका

**''शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सुद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत...''**

**– राजर्षी छ. शाहू महाराज**

### संस्थेचा परिचय

राजर्षी छ. शाहू महाराजांचा वैचारिक वारसा जोपासत १९८२ साली कोल्हापूर महानगरपालिकेने प्राथमिक शाळेबरोबर शहरी आणि ग्रामीण भागातील मुलांसाठी विशेषतः मुलींसाठी उच्च शिक्षणाची सोय व्हावी या हेतूनी या महाविद्यालयाची स्थापना केली. महानगरपालिकेसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थेने सुरु केलेले हे महाराष्ट्रातील एकमेव कॉलेज आहे. मुंबई प्रायमरी स्कूल ॲक्ट नुसार केवळ प्राथमिक शिक्षणाची सोय महानगरपालिकेने करायची असते. पण आपल्या कोल्हापूर महानगरपालिकेने या ॲक्टच्या पुढे एक पाऊल टाकले आणि माध्यमिक शिक्षणाबरोबर महाविद्यालयीन शिक्षणाची सोय आपल्या महानगरपालिकेने या महाविद्यालयाची स्थापना करून केली. ही एक क्रांतिकारी घटना आहे. आणि या मागे निश्चितपणे राजर्षी छ. शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचारच आहेत. राजर्षी छ. शाहू महाराजांचा शैक्षणिक वारसा चालवणारे आणि बहुजन समाजातील विद्यार्थ्यांचा आधार वड अशी ओळख असणारे, 'बहुजन सुखाय आणि बहुजन हिताय' या तत्वांवर चालणारे कॉलेज म्हणजे यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज.

**आमचे महाविद्यालय :**

यशवंतराव चव्हाण (के एम.सी.) कॉलेजची स्थापना करुन कोल्हापूर महापालिकेने राजर्षी छ. शाहू महाराज यांचा वैचारिक वारसा जोपासत नव्या जगाच्या गतिमान वाटचालीत अव्याहतपणे अग्रेसर राहण्याचा आमचा निर्धार आहे. यावर्षी महाविद्यालयाने ३९ व्या वर्षात पदार्पण केले आहे. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून आमचा प्रवास सुरु आहे. वर्गात आणि वर्गाबाहेर उत्तमोत्तम सुसंस्कार घडविण्यासाठी आम्ही नेहमीच प्रयत्नशील असतो. कारण आजचा विद्यार्थी हा उद्याचा नागरिक असतो. सुशिक्षित आणि सुसंस्कृत नागरिक राष्ट्र उभारणीच्या कार्यात महत्त्वाची भागीदारी करु शकतात हे विचारात घेऊन त्यासाठी सदैव कटिबद्ध आहोत. म्हणुनच अल्पावधीत करवीर नगरीतील एक वेगळं आणि वैशिष्ट्यपूर्ण महाविद्यालय म्हणून यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेजची सर्वांना ओळख पटली आहे.

**विविध उपक्रम**

विद्यार्थ्यांच्या विकासासाठी बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा अनिवार्य बनला आहे. 'कोविड-१९' च्या संकटाने शिक्षणक्षेत्रातही आमूलाग्र बदल होणार आहेत. त्यासाठी हे महाविद्यालय पूर्णपणे सज्ज आहे. संगणक कक्ष, ICT रूम, उपलब्ध आहेत. व्हॉटस् अप ॲप, गुगल फॉर्म्स, गुगल क्लासरुम, वेबिनार या सारख्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यास महाविद्यालय सक्षम आहे. या बरोबर मा. आयुक्त श्री. डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येणाऱ्या स्वच्छता मोहिम, उद्यान दत्तक योजना मुळे विद्यार्थ्यामध्ये सामाजिक जाणीव जोपासण्यास मदत होत आहे.

**प्रस्तावित उपक्रम**

१) विद्यार्थ्यांसाठी मोफत के.एम.टी बस पास

२) श्री. यशवंतराव चव्हाण मुक्त वाचन उद्यान

३) मोडी व पाली लिपी वर्ग

४) ग्रामीण पत्रकारिता वर्ग

५) नाट्यशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम

६) कोल्हापूरातील मर्दानी खेळ प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**विविध कलांना प्रोत्साहन :**

आजची शिक्षणपद्धती ही विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांच्या सर्वांगिण

व्यक्तीमत्त्वाचा विकास अपेक्षित करते. या दृष्टीने महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव, त्यांच्या सहज सुलभ आविष्काराला संधी मिळण्यासाठी आम्ही विविध मंडळे स्थापन केलेली आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या कलाक्षेत्रात मार्गदर्शन मिळते. एवढेच नव्हे, तर ते विविध ठिकाणी यशस्वी व्हावेत म्हणून सातत्याने प्रयत्न कले जातात. कलाकथन, निबंधलेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, नृत्य, नाट्य, क्रीडा, संगीत, चित्रकला, वाद्यवादन, वक्तृत्त्व इ. कलात रस असणाऱ्या विद्यार्थ्यांची आवश्यक ती सर्व तयारी करुन घेऊन त्यांना विविध स्पर्धांना व युवा महोत्सवासाठी जिल्हा व मध्यवर्ती स्तरावर पाठविले जाते.

**वाङ्:मय चर्चा मंडळ :**

या मंडळातर्फे आम्ही साहित्यिक-विचारवंत यांना महाविद्यालयात व्याख्यानासाठी, चर्चेसाठी बोलावतो. विद्यार्थ्यांचा व श्रेष्ठ व्यक्तींचा दिलखुलास संवाद घडवून आणला जातो. विविध वाङमय प्रकाराच्या निर्मितीसाठी कृतिसत्रे आयोजित करुन सर्जनशील विद्यार्थी लेखकांना मार्गदर्शन केले जाते.

**राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.):**

युवा शक्तीचा राष्ट्र उभारणीसाठी उपयोग करण्याबरोबरच त्यांच्या अंगी श्रम प्रतिष्ठेचे मूल्य जोपासणे, त्यांच्यात बौध्दिक प्रबोधन घडवून आणणे, राष्ट्रीय एकात्मा वाढविणे इत्यादी उदात्त उद्दिष्टांसाठी आम्ही 'राष्ट्रीय सेवा योजना' कार्यान्वित केलेली आहे. या योजनांतर्गत विद्यार्थ्यांना विविध शिबिरात सहभागी होता येते व विविध प्रकल्पांच्या माध्यमाने ते खऱ्या अर्थाने समाजाशी जवळीक साधू शकतात. तसेच विविध सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक अपूर्व आत्मविश्वास येतो. आपल्या महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय पातळीवरील शिबिरात निवडले गेले आहेत. अशा विद्यार्थ्यांना एन.एस. एस. प्रमाणपत्र दिले जाते. शिवाय या प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थ्यांना नोकरीत प्राधान्य दिले जाते. कोल्हापूर सारख्या ऐतिहासिक शहराची पुरेपूर ओळख व्हावी या हेतूने 'हेरिटेज वॉक' ही आयोजित करण्यात येणार आहे.

**निसर्गभ्रमण मंडळ व सहल :**

चार भिंतीबाहेर पडून युवाशक्तीला अनुभवाने ज्ञान मिळावे. साहसाला वाव मिळावा, निसर्गाशी हितगुज साधता यावे, गड-किल्ले यांच्या भ्रमणाने इतिहासाचा मागोवा घेता यावा इ. शैक्षणिक उद्दिष्टासाठी या मंडळातर्फे निसर्गभ्रमण यासारख्या अभ्यास सहलीचे आयोजन केले जाते.

**पारिजात निसर्ग मंडळ :**

शहरी संस्कृतीचा उबग आणणाऱ्या वातावरणात गुदमरणाऱ्या युवा शक्तीला 'चला निसर्गाकडे' ही साद मंडळतर्फे घातली जाते. वाढते प्रदुषण, व्यसनाधीनता इ. समस्यांनी आपले जीवन उधवस्त होऊ लागले आहे. या समस्यावर मात करण्यासाठी विविध उपक्रम, विधायक प्रकल्प, व्याख्याने व शिबिरे या मंडळातर्फे आयोजित केली जातात.

**सामाजिक संशोधन पध्दती:**

बी.ए/बी.कॉम. भाग ३ मधील विद्यार्थ्यांसाठी संशोधनाविषयी तसेच प्रकल्प, सेमिनार इत्यादी विषयी मार्गदर्शन केले जाते व महाविद्यालयातील तज्ज्ञ प्राध्यापकांकडून जादा तास घेऊन या विद्यार्थ्यांना संशोधनाविषयी मार्गदर्शन केले जाते. 'सामाजिक संशोधन पध्दती' हा कोर्स तीन महिन्याचा प्रमाणपत्र कोर्स सन २०१२ पासून समाजशास्त्र विभागामार्फत सुरु करण्यात आला आहे.

**राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी):**

आमच्या महाविद्यालयामध्ये प्रशिक्षित, अनुभवी प्राध्यापकांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांसाठी 'राष्ट्रीय छात्र सेना विभाग' (एन.सी.सी.) कार्यान्वित आहे. या विभागातर्फे विविध ट्रेनिंग कोर्ससाठी विद्यार्थी पाठविले जातात, अशा विद्यार्थ्यांना एन.सी.सी. विभागातर्फे प्रमाणपत्र मिळते व हे प्रमाणपत्र पुढे नोकरीत प्राधान्य मिळवून देण्यास अत्यंत उपयुक्त ठरते. आमच्या कॉलेजच्या एन.सी.सी. विभागाचा अनेक छात्रांना चांगल्या प्रकारे उपयोग झाला आहे व पुढे होत राहील, यादृष्टीने आमचे प्रयत्न आहेत.

**क्रीडा विभाग :**

खेळ ही मानवाची जन्मजात सहजप्रवृत्ती आहे. विद्यार्थ्यांच्या शरीराची व मनाची वाढ ही खेळावर, व्यायामावर अवलंबून असते. म्हणूनच खेळ व स्पर्धा ही शरीराच्या व मनाच्या निरोगीपणाचे लक्षण समजण्यात येते. म्हणूनच 'साऊंड माइंड इन साऊंड बॉडी' (निकोप शरीरातच निकोप मन वास करते.) या उक्तीवर आमचा दृढ विश्वास असल्यामुळे अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांचे मनात खेळाविषयी आवड निर्माण करण्यासाठी आमचे महाविद्यालय सदैव प्रयत्नशील आहे. क्रीडा क्षेत्रात नावलौकीक मिळविता यावा यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक सोयी-सवलती पुरविण्यावर भर दिला जातो. विविध खेळांच्या प्रशिक्षणाची विशेष अशी सोय या महाविद्यालयामार्फत केली जाते. महानगरपालिकेची विस्तृत मैदाने महाविद्यालयासाठी नेहमीच खुली आहेत.

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन :**

एम.पी.एस.सी. व यू.पी.एस.सी. तसेच इतर विविध स्पर्धात्मक परीक्षेबाबत

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी महाविद्यालयात स्वतंत्र स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले आहे. या केंद्रात तज्ज्ञ मार्गदर्शकांकरवी स्पर्धा परीक्षेबाबतची माहितीपर व्याख्याने आयोजित केली जातात व विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन केले जाते. यशस्वी विद्यार्थ्यांची व्याख्याने आयोजित करण्यावर भर दिला जातो.

**ग्रंथालय:**

व्यक्तिमत्त्व विकासात पुस्तके ही नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावत असतात. ग्रंथ हेच खऱ्या अर्थाने मार्गदर्शक असतात. साहजिक समृद्ध आणि अद्यावत असे ग्रंथालय महाविद्यालयाचे भूषण असते. संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, इतर दर्जेदार ललित ग्रंथ,नियतकालिके यांनी आमचे ग्रंथदालन समृध्द आहे. विशेष गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना महाविद्यालयामार्फत पुस्तक संच पुरविले जातात. पुस्तक पेढीसारख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करुन दिली जातात, 'ग्रंथालय व्यवस्थापन' प्रमाणपत्र अभ्यासक्रम हा शिवाजी विद्यापीठ प्रौढ आणि निरंतर शिक्षण विभागाच्या वतीने सन १९८६ पासून ग्रंथालय विभागातर्फे आहे.

**प्लेसमेंट सेल:**

या सेलमार्फत विद्यार्थ्यांना मोफत रोजगार विषयक माहिती दिली जाते. स्पर्धा परीक्षांची तयारी करणे त्याचबरोबर रोजगार विषयक मेळावे आयोजित केले जातात. इत्यादी काम या सेल मार्फत केले जाते.

**अभ्यासिका:**

सुट्टीच्या व परीक्षा कालावधीत विद्यार्थ्यांना एकाग्रतेने अभ्यास करता यावा यादृष्टीने या कॉलेजने विद्यार्थी अभ्यासिका सुरु केली आहे. या अभ्यासिकेने विद्यार्थ्यांना अभ्यासाची चांगलीच गोडी निर्माण करुन दिल्याने विद्यार्थ्यांच्यात अभ्यासिकेबाबत आत्मीयता निर्माण झाली आहे.

**दत्तक पालक योजना:**

विद्यार्थी-शिक्षक यांच्यामध्ये वैचारिक दरी निर्माण होत आहे. असे मत सध्या निदर्शनास येते आहे. हे अंतर कमी व्हावे किंबहुना अंतर निर्माण होऊ नये व त्या निर्भयपणे आपले अध्ययन पूर्ण करू शकतात. तसेच आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना सहाय्य मिळावे या करिता 'विद्यार्थी दत्तक योजना' आमच्या महाविद्यालयामध्ये सुरु केली आहे. वर्षभर हे विद्यार्थी आणि प्राध्यापक परस्परांशी सुसंवाद साधतात. विद्यार्थ्यांच्या अडी-अडचणी समजावून घेऊन त्यांना योग्य ते सहकार्य दिले जाते हा या योजनेमागील हेतू आहे.

**अंतर्गत तक्रार निवारण समिती:**

महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या आलेल्या तक्रारींचे या समितीमार्फत निवारण केले जाते जेणेकरुन कोणावरही अन्याय होणार नाही याची दक्षता घेतली जाते व सर्व तक्रारींचे निरसण केले जाते. विशेषतः मुलींना सुरक्षिततेच्या दृष्टीने दिलासा मिळतो.

## विद्यार्थी शिष्यवृत्ती

**१) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती:**

जे विद्यार्थी मागासवर्गीय उदा.अनु.जाती/अनु.जमाती/वि.जा.भ.ज./वि.मा.प्र. या जातीचे असतील त्यांना एस.एस.सी. (१० वी ) किंवा एच.एस.सी.(१२ वी ) पास होऊन कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यावर ही शिष्यवृत्ती मिळते. विद्यार्थ्यांचे शिक्षणक्रमात खंड असल्यास त्याने मॅजिस्ट्रेटसमोर रु. १००/- च्या स्टँप पेपरवर कारणे लिहून हमी दिली पाहिजे व विद्यार्थी मागासवर्गीय प्रवर्गातील असतील त्यांना त्यांच्या वडिलांचे वार्षिक उत्पन्न रु.२,००,०००/-(रु.दोन लाख) व OBC / NT & SBC करीता रु. १,००,०००/-(रु.एक लाख) पर्यंत लाभ घेता येतो.

तसेच इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्याने आपल्या वडिलांचे १ एप्रिल ते ३१ मार्च या विहीत कालावधीचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र व जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

विद्यार्थी नापास असल्यास किंवा समकक्ष कोर्ससाठी शिष्यवृत्ती घेतली असल्यास तो विद्यार्थी या शिष्यवृत्तीस पात्र ठरणार नाही. विद्यार्थी पूर्णकाळ नोकरी करीत असल्यास शिष्यवृत्तीस पात्र ठरणार नाही. एका कुटुंबातील दोनपेक्षा अधिक मुलांना शिष्यवृत्ती मिळणार नाही. शिष्यवृत्ती प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक वर्षाकरिताच मिळते.

**पूर्तता :** १) शिष्यवृत्ती अर्ज व्यवस्थित व बिनचूक भरून प्रवेशाच्या वेळीसच सादर करणे आवश्यक आहे. २) अर्जातील जातीचा, उत्पन्नाचा दाखला प्रांताधिकारी/ उपविभागीय अधिकारी यांच्या सहीचा असणे आवश्यक आहे. ३) घोषित उत्पन्नावर वडिलांची सही बार अंगठा असला पाहिजे अंगठा असल्यास दस्तूर आवश्यक ४) शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रमाणित प्रत जोडली पाहिजे. ५) सदर विद्यार्थ्यांची हजेरी ८० टक्के आवश्यक आहे.

**२) दिव्यांग विद्यार्थी शिष्यवृत्ती :**

अस्थिव्यंगामुळे दिव्यांग झालेल्या विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. एच.एस.सी. परीक्षेत किमान ४० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविलेल्या अशा अपंग

विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येतो. विशिष्ट नमुन्यातील अर्ज, व्यंग स्पष्ट दिसेल असा स्वतःचा फोटो, जन्मतारखेचा व उत्पन्नाचा दाखला तसेच वैद्यकीय प्रमाणपत्र आणि एच.एस.सी. परीक्षेचे गुणपत्रक यासह दि.३१ जुलैपर्यंत अर्ज करावा लागतो. तसेच महानगरपालिकेकडून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मोफत बससेवा व उच्च शिक्षणासाठी भरपूर सवलती दिलेल्या आहेत.

**३) हिंदी शिष्यवृत्ती**

अहिंदी प्रदेशात हिंदीच्या अभ्यासकांना भारत सरकार ही शिष्यवृत्ती देते, एच.एस.सी. परीक्षेत हिंदी विषयामध्ये ६० % पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येतो. शिष्यवृत्ती मंजूर झाल्यास बी.ए. भाग १, २ व ३ या वर्षाकरिता हिंदी हा ऐच्छिक विषय घेऊन दरवर्षी परीक्षेत उत्तीर्ण होणे आवश्यक असते. ही शिष्यवृत्ती स्वीकारल्यानंतर अन्य कोणतीही शिष्यवृत्ती घेता येत नाही. ठराविक नमुन्याप्रमाणे हा अर्ज दि.३१ ऑक्टोबर पूर्वी गुणपत्रक व फोटो यासह अर्ज करावा लागतो.

**४) अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती : (Post Matric Scholarship)**

राज्यातील मुस्लिम, पारशी, शीख,ख्रिश्चन आणि बौध्द समुदायातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २००७-२००८ पासून लागू करण्यात आली आहे. यासाठी आवश्यक पात्रताः

१) अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्राचा रहिवासी असावा.२) किमान ५० टक्के गुणांनी उत्तीर्ण झाला असावा. ३) वार्षिक उत्पन्न २ लाखापेक्षा कमी असावे. ४) इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभार्थी नसावा

**५) राज्यशासनाची खुली गुणवत्ताः**

सन २००७-२००८ पासून ही राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती सुरु झाली आहे. एच.एस.सी.मध्ये ज्या विद्यार्थ्यांना किमान ५० टक्के गुण मिळाले आहेत तेच विद्यार्थी यासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत.

**६) राजर्षी छ.शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती :**

या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या सर्व खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी छ. शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना २०१८-१९ पासून शासनाने सुरु केलेली आहे. या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीसाठी कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे. या योजनेकरीता अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न रु.८,००,०००/- किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे

**अर्जासोबत लागणारी आवश्यक कागदपत्रे :**

१. ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्जाची प्रिंट २. प्रवेश पावती ३. आयकार्ड झेरॉक्स ४. आधार कार्ड ५. उत्पन्नाचा दाखला मूळप्रत ६. रहिवासी दाखला ७. रेशनकार्ड/प्रतिज्ञापत्र ८. १०/१२ वी पास दाखला व गुणपत्रके ९. सेव्हिंग बँक पासबुक (राष्ट्रीयकृत बँकेत स्वतःच्या नावाचे बँक खाते) १०. बँक आधार लिंकची मूळपावती ११. शैक्षणिक गॅप असल्यास त्याचे सर्टिफिकेट १२. आई/वडील हयात नसल्यास मृत्यू दाखला झेरॉक्स प्रत.

या योजनेतंर्गत पात्र विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या बँक खात्यावर परस्पर शासनाकडून जमा केली जाते. विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती फॉर्म भरताना चूकीची माहिति भरल्यास त्यामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल/दुरुस्ती करता येणार नाही. त्यामुळे अचुक माहिती भरावी. चुकीची माहिती भरल्यास किंवा शिष्यवृत्ती फॉर्म रद्द झाल्यास होणाऱ्या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

**७) मिळालेल्या शिष्यवृत्तीचे नूतनीकरण :**

अ) बी.सी. शिष्यवृत्तीसाठी बी.ए./बी.कॉम. भाग १ च्या वर्गासाठी नवीन अर्ज करावे लागतात. बी.ए./बी.कॉम. भाग २ पासून नूतनीकरणासाठी अर्ज करावे लागतात. अर्जासोबत वसतिगृहात असल्यास वसतिगृहाचा दाखला व गुणपत्रक जोडावे लागते, असे अर्ज दि.३१ ऑगस्टपूर्वी कार्यालयास सादर करावेत.

ब) इतर शिष्यवृत्ती एकदा मंजूर झाल्यावर पुढे प्रत्येक वर्षासाठी नूतनीकरण करावे लागते. नूतनीकरण होण्यासाठी वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झाले पाहिजे वार्षिक परीक्षेचा निकाल लागताच विद्याध्यनि आपले गुणपत्रक व त्याची खरी नकल यासह नूतनीकरणाचा अर्ज करावा दुसया कॉलेजमधून आलेल्या विद्याथ्यांनी आपला प्रगती अहवाल (प्रोग्रेस रिपोर्ट) पूर्वीच्या कॉलेजमधून भरून आणणे आवश्यक आहे.

## ✻ फी सवलतीसंबंधी अधिक माहिती ✻

**१) इ.बी.सी.सवलत:**

१) ज्यावर्षी फी माफी सवलतीसाठी अर्ज करावयाचा आहे त्यापूर्वी संपलेल्या आर्थिक वर्षातील (म्हणजे १ एप्रिल ते ३१ मार्चपर्यंतचे उत्पन्न) एकूण उत्पन्न हिशोबात धरावयाचे असते. ठराविक नमुन्यातील उत्पन्नाच्या दाखल्यात या मुदतीतील उत्पन्नाचा उल्लेख असावा.

२) सर्व विद्यार्थ्यांनी पालकांच्या उत्पन्नाचा मा. तहसीलदार यांनी प्रदान केलेला दाखला सादर करावा.

३) आई-वडील हयात असल्यास दोघे किंवा त्यांच्यापैकी जे हयात असतील तेच मुलांच्या पालन पोषणासाठी जबाबदार आहेत असे गृहीत धरले जाईल, शिवाय इतर नातलग चुलते, भाऊ, मामा इ. जबाबदार धरले जाणार नाहीत. आई-वडील दोघे हयात नसल्यास त्यासंबंधीचा ग्रामपंचायत किंवा महानगरपालिकेचा मृत्यूचा दाखला जोडला पाहिजे.

४) ज्या विद्यार्थ्यांचे आई-वडील, पालक यांचे नेहमीच राहण्याचे ठिकाण महाराष्ट्रात आहे, त्यांनाच फक्त महाराष्ट्र राज्यातील सरकारमान्य शिक्षण संस्थात ही सवलत मिळू शकते.

५) फी माफीची सवलत मिळणे पुढील बाबींवर अवलंबून असते.

अ) नियमित उपस्थिती, ब) समाधानकारक प्रगती, क) चांगली वर्तणूक इत्यादी नियमांचे पालन होत नाही असे आढळून आले तर ही सवलत काढून घेण्यात येईल अगर बंद करण्याचे अधिकार प्राचार्यांना देण्यात आलेले आहेत.

**२) प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांच्या मुलांना फी सवलत :**

सरकारी शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (नगरपालिका, महापालिका, जिल्हा परिषद इ.) शाळा आणि मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या मुला-मुलींना त्यांच्या आई-वडीलांचे उत्पन्न विचारात न घेता फी माफीची सवलत मिळते.

**अटी** : विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील असावा तसेच तो मागील वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला पाहिजे.

**पूर्तता** : १) कॉलेजमध्ये प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यांच्या आई-वडीलांनी दोन प्रतीत अर्ज करावा.

२) अर्जासोबत विहित नमुन्यातील सेवा प्रमाणपत्राच्या दोन प्रती

३) विद्यार्थ्यांच्या गुणपत्राकाच्या दोन प्रती जोडाव्यात.

**३) स्वातंत्र सैनिकांच्या मुलांना फी सवलत व शिष्यवृत्ती:**

स्वातंत्र सैनिकांच्य मुला-मुलींना ही सवलत मिळते. सवलतीसाठी उत्पन्नाची अट नाही.

**पूर्तता**: १) ठराविक नमुन्यातील अर्जाच्या दोन प्रती अर्जासोबत जोडाव्या लागतात २) स्वातंत्र सैनिक सन्मानपत्राच्या दोन अस्सल नकला. ३) मागील वर्षी ही सवलत जेथे चालू होती तेथील प्रमुखांकडून त्या सवलत मंजूरपत्राचा नंबर व दिनांक लेखी आणावा. ४) करारनामा दोन प्रतीत. ५) वार्षिक परीक्षेच्या गुणपत्रकाच्या दोन प्रती. ६) विद्यार्थी

जिल्हा बदलून आला असल्यास त्या जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांच्या सही-शिक्क्यासह जिल्हाबदल दाखला आवश्यक आहे.

**शिष्यवृत्ती, फी सवलतीसंबंधी महत्त्वाची सूचना :**

मागासवर्गीय शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन (Online) भरणे आवश्यक आहे. त्याकरीता पुढील वेबसाईटचा वापर करण्यात यावा.

**http//:mahadbtmahait.gov.in** या वेबसाईटवर शिष्यवृत्तीचा फॉर्म भरुन त्याची प्रिंट आऊट **(Hard Copy)** महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये संबंधित लिपिकाकडे जमा करणे आवश्यक आहे. सदर प्रिंट आऊट कार्यालयाकडे न दिलेस समाजकल्याणाकडे आपला अर्ज जाणार नाही व त्यामुळे स्कॉलरशिप मिळाली नाही तर त्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील.

**अध्यापनाचे माध्यम:**

कला व वाणिज्य या दोन्ही शाखात मराठी माध्यमातून अध्यापन केले जाते. शिवाय इंग्रजी माध्यमातून आलेल्या विद्यार्थ्यांना आवश्यक असेल तर इंग्रजी माध्यमातून मार्गदर्शन करण्यात येते.

# विषयाची निवड

## कला (आर्ट्स विभाग)

**सूचना :** एकदा निवडलेला विषय नंतर बदलता येणार नाही याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

### बी.ए.भाग-१ (सेमिस्टर १ व २)

**अ) आवश्यक विषय :** १. इंग्रजी २. पुढीलपैकी एक-मराठी, हिंदी, एस.टी.डी.

**ब) ऐच्छिक विषय (एकूण चार)**

पुढील अ आणि ब गटापैकी कोणतेही चार, पण प्रत्येक गटामधून किमान एक विषय निवडणे आवश्यक आहे.

अ गट : मराठी, हिंदी, इंग्रजी

ब गट : अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र, भूगोल, शारीरिक शिक्षण

**सूचना :** वरील ऐच्छिक विषयांचे पुढीलप्रमाणे समूह करण्यात आलेले आहेत. त्यानुसार विषयांची निवड करावी.

१) भूगोल किंवा समाजशास्त्र

२) राज्यशास्त्र किंवा मराठी

३) अर्थशास्त्र किंवा शारीरिक शिक्षण

४) मानसशास्त्र किंवा हिंदी

५) इतिहास किंवा इंग्रजी

**बी.ए. भाग २ : (सेमिस्टर ३ व ४)**

अ) आवश्यक विषय : १. इंग्रजी

२. पर्यावरण अभ्यास

ब) आय. डी. एस. (खालीलपकी एक विषय निवडावा.)

१) तर्कशास्त्र

२) महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास

३) सार्वजनिक प्रशासन (लोक प्रशासन)

**आय. डी. एस. विषय निवडताना तो एक ऐच्छिक विषयांशी संबंधित असावा जसे**

| **आय.डी.एस.विषय** | **संबंधित ऐच्छिक विषय (पेपर क्र.३ व ४)** |
|---|---|
| १) तर्कशास्त्र | अर्थशास्त्र<br>इतिहास<br>समाजशास्त्र<br>भूगोल<br>मानसशास्त्र<br>मराठी<br>हिंदी |
| २) महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास | राज्यशास्त्र<br>इतिहास<br>समाजशास्त्र<br>मानसशास्त्र<br>मराठी |
| ३) सार्वजनिक प्रशासन (लोक प्रशासन) | अर्थशास्त्र<br>राज्यशास्त्र<br>इतिहास<br>समाजशास्त्र<br>भूगोल<br>मानसशास्त्र |

**ऐच्छिक विषय :** बी.ए.भाग-१ मध्ये निवडलेल्या चार ऐच्छिक विषयांपैकी कोणतेही दोन विषय निवडावेत.

ऐच्छिक विषय निवडताना खालील समूहांतून निवडावेत. 'अ' गटातून एक भाषा घेणे आवश्यक

**अ-गट :** १) मराठी/ हिंदी/ इंग्रजी

**ब-गट :** २) अर्थशास्त्र / राज्यशास्त्र / मानसशास्त्र / भूगोल / समाजशास्त्र / इतिहास

**टीप :** बी.ए.भाग-२ साठी आवश्यक पर्यावरण अभ्यास विषयाची ७० गुणांची परीक्षा व ३० गुणांचा प्रकल्प शिवाजी विद्यापीठाच्या नियमानुसार असेल.

**बी.ए.भाग - ३ (सेमिस्टर ५ व ६)**

**अ) आवश्यक विषय :** इंग्रजी

**ब) ऐच्छिक विषय :** बी.ए.भाग-२ मध्ये निवडलेल्या दोन ऐच्छिक विषयांपैकी कोणताही एक विषय निवडावा. त्याचे एकूण सेमिस्टर पाच साठी पाच पेपर्स व सेमिस्टर सहासाठी पाच पेपर्स शिवाजी विद्यापीठ सुधारित सेमिस्टर परीक्षा पद्धतीनुसार राहतील.

| | |
|---|---|
| १) मराठी | २) हिंदी |
| ३) इंग्रजी | ४) समाजशास्त्र |
| ५) राज्यशास्त्र | ६) भूगोल |
| ७) अर्थशास्त्र | ८) इतिहास |

## वाणिज्य (कॉमर्स विभाग)

**बी.कॉम.भाग - १ (सेमिस्टर १ व २)**

| | |
|---|---|
| १) इंग्रजी (पेपर क्रं. १ व २) | Business Communication |
| २) व्यवसाय व्यवस्थापनाची मूलतत्त्वे (१ व 2) | Principal of Business Management |
| ३) विमाशास्त्र (१ व २) | Insurance |
| ४) व्यावसायिक अर्थशास्त्र (१ व २) | Business Economics |
| ५) विपणनाची मुलतत्त्वे (१ व २) | Principal of Marketing |
| ६) फिनानशिअल अकौंटिंग (१ व २) | Financial Accountancy |

**बी.कॉम.भाग २ (सेमिस्टर ३ व ४)**

| | |
|---|---|
| १) इंग्रजी (पेपर क्रं. १ व २) | Business Communication |
| २) व्यवसायीक संख्याशास्त्र (१ व २) | Business Statistics |
| ३) व्यावसायिक अर्थशास्त्र (१ व २) | Business Economics |
| ४) उद्योजकतेची मूलतत्त्वे (१ व २) | Fundamentals of Entrepreneurship |
| ५) कॉर्पोरेट अकौंटींग (१ व २) | Corporate - Accountancy |
| ६) पैसा आणि वित्तीय रचना (१ व २) | Money and Financial System |
| ७) पर्यावरण अभ्यास | Environmental Studies |

टीप : बी.कॉम –२ साठी आवश्यक पर्यावरण अभ्यास विषयाची ७० गुणांची परीक्षा व ३० गुणांचा प्रकल्प शिवाजी विद्यापीठाच्या नियमानुसार असेल.

**बी. कॉम. भाग ३ (सेमिस्टर ५ व ६)**

**आवश्यक विषय :**

१) आधुनिक व्यवस्थापन व्यवहार (पेपर क्र.१व२) Modern Management Practices

| | |
|---|---|
| २) व्यवसाय नियमन (१ व २) विषयक कायद्याची रचना | Business Regulatory Framework Environment |
| ३) व्यावसायिक पर्यावरण (१ व २) | Business Environment |
| ४) सहकाराचा विकास (१ व २) | Co-operative Development |

**ऐच्छिक विषय :**

पुढीलपैकी कोणत्याही एका विषयाचे दोन पेपर्स असतील.

| | |
|---|---|
| १. ॲडव्हान्सड अकौंटन्सी | (Advanced Accountancy) Paper I II |
| २. ॲडव्हान्सड बँकिंग | (Advanced Banking) Paper I II |
| ३. औद्योगिक व्यवस्थापन | (Industrial Management) Paper 1 11 |

## कॉलेज प्रवेश फी तक्ता

| अ.नं. | तपशील | एकूण रुपये |
|---|---|---|
| १. | प्रवेश फी | १०.०० |
| २. | ग्रंथालय फी | ५०.०० |
| ३. | जिमखाना फी | ८०.०० |
| ४. | शिक्षण फी | ८००.०० |
| ५. | यशवंत नियतकालिक | २५.०० |
| ६. | कल्चरल कार्यक्रम | ०५.०० |
| ७. | विद्यार्थी सहाय्यता निधी | ०५.०० |
| ८. | विद्यार्थी युवा महोत्सव निधी | ५५.०० |
| ९. | ओळखपत्र | ४०.०० |
| १०. | दुवार ओळखपत्र | ५०.०० |
| ११. | कॉशनमनी ठेव | १०.०० |
| १२. | ग्रंथालय ठेव | १०.०० |
| १३. | कॉलेज परीक्षा फी | ३०.०० |
| १४. | प्रो-रेटा कॉंट्रिब्युशन | ३०.०० |
| १५. | विकास निधी | ५०.०० |
| १६. | अश्वमेध शुल्क | ३०.०० |
| १७. | आपत्कालीन निधी | १०.०० |
| १८. | कल्याण निधी | ५०.०० |
| १९. | अग्रणी महाविद्यालय शुल्क | २५.०० |
| २०. | पर्यावरण अभ्यास | २५५.०० (बी.ए.व बी कॉम २ साठी) |
| २१. | ई सेवा शुल्क | ५०.०० |

**टीप :** महाराष्ट्र शासन व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या परीपत्रक/शासन निर्णयानुसार उपरोक्त फी मध्ये बदल होऊ शकतो..

१) इतर महाविद्यालयाकडून या महाविद्यालयात नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रवेश फी भरावी लागेल

२) ग्रंथालय डिपॉझीट व कॉशनमनी डिपॉझीट ही रक्कम प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला प्रथम भरावी लागले. सदर डिपॉझिटची रक्कम कॉलेज सोडल्यानंतर परत मिळेल. मात्र त्याची मूळ पावती (Original Receipt) हजर करावी लागेल. विद्यार्थ्याने पहिल्या सत्रात किंवा दुसऱ्या सत्रात कॉलेज सोडल्यास त्याने भरलेली कोणतीही फी कोणत्याही कारणास्तव परत केली जाणार नाही.

३) बी.ए.भाग-३ च्या स्पेशल भूगोल हा विषय घेणाऱ्या विद्यार्थ्याला वर्षाची प्रॅक्टिकल फी रु. ५०/- भरावी लागेल

४) आपल्या फी बाबतच्या सर्व पावत्या जपून ठेवाव्यात.

५) बोनाफाईट सर्टिफिकेटसाठी रु.५/- भरावे लागतील. त्यासाठी रीतसर अर्ज करावा.

६) विद्यार्थ्यांना द्यावे लागणारे शैक्षणिक शुल्क शासनाच्या व शिवाजी विद्यापीठाच्या बदलत्या नियमांनुसार देय राहील.

## प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे

१) मागील वर्षाच्या उत्तीर्ण परीक्षेचे गुणपत्रक व त्याची झेरॉक्स १ प्रत.

२) ई.बी.सी. सवलत पुढे चालू /आर्थिकदृष्ट्या मागास (नादारी अर्ज) २ प्रती व तहसीलदारांनी प्रदान केलेली १ लाखापर्यंतचा उत्पन्नाचा दाखला.

३) शाळा सोडल्याचा मुळ दाखला (एल.सी.)/ट्रान्सफरन्स सर्टिफिकेट (टी.सी.)

४) फी भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतेवेळी संपूर्ण फी भरणे आवश्यक आहे.

५) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जातीच्या दाखल्याची एक झेरॉक्स प्रत.

६) आधार कार्ड / मतदान ओळखपत्राची झेरॉक्स दोन प्रती.

## पालकांना सूचना

१) ११ जून, २०१९ पासून कॉलेजचे सर्व वर्ग नियमित सुरु होत आहेत. विद्यार्थ्याला वेळेवर कॉलेजला पाठवावे.

२) पालकांनी वेळोवेळी कॉलेजमध्ये येऊन आपल्या पाल्याच्या प्रगतीसंबंधी चौकशी करावी.

३) आपल्या पाल्याजवळ आवश्यकता अभ्यासक्रमाची पुस्तके आहेत याची खात्री करावी.

# विद्यार्थ्यांकरीता आचारसंहिता

महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी या प्रत्येक घटकांनी शिस्तीचे स्वयंपूर्ण पालन केल्यास महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल होतेच. यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी शिस्तपालनासाठी ठरविण्यात आलेल्या पुढील नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

१. ओळखपत्र : महाविद्यालयात प्रवेश घेतल्याबरोबर विद्यार्थ्याने ओळखपत्र घेणे आवश्यक आहे. ओळखपत्रासाठी रु.४०/- कार्यालयात भरावे लागतील. ओळखपत्रावर प्राचार्यांची स्वाक्षरी घेऊन ते महाविद्यालयात येताना नियमितपणे महाविद्यालयाच्या आवारात, सभा, क्रीडागंणावर, परीक्षा केंद्र, ग्रंथालय इ. ठिकाणी विद्यार्थ्यांजवळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे. तसेच ते गळ्यात अडकवणे बंधनकारक राहील.

२. महाविद्यालयातील सर्व वर्गातील प्रवेश शिवाजी विद्यापीठाच्या/ शासनाच्या नियमानुसार असतील.

३. विविध मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंबंधी त्या विद्यार्थ्यांची किंवा पालकांची काही तक्रार असल्यास ती महाविद्यालयातील प्राचार्यांकडे करावी.

४. कॉलेजमधील नियमित उपस्थित किमान ८० % आवश्यक आहे. सबळ कारण व पूर्वपरवानगी शिवाय गैरहजर राहिल्यास अशा विद्यार्थ्याचा महाविद्यालयातील प्रवेश रद्द केला जाईल. आणि परीक्षेचा फॉर्म भरला जाणार नाही.

५. महाविद्यालयातील अध्यापनात होणारी नियमित व्याख्याने, परीक्षा, चाचण्या, सेमिनार, प्रोजेक्ट, शारीरिक शिक्षण परीक्षा, छात्रसेनेची संचलने, राष्ट्रीय सेवा योजनेचे विविध उपक्रम व इतर सामाजिक उपक्रम इत्यादींना नियमित उपस्थिती असली पाहिजे.

६. विद्यार्थी हा समाजाचा जबाबदार घटक आहे हे मान्य केल्यावर कॉलेजचे तास चालू असताना कोणत्याही विद्यार्थ्याला व्हरांडयातून फिरणे, इतर वर्गांना त्रासदायक वर्तन करणे, कॉलेजच्या प्रांगणात गैरवर्तन करणे अथवा कॉलेजच्या मालमत्तेस नुकसान पोहोचविणे यांसारख्या गोष्टी कडक कारवाईस कारणीभूत ठरतात हे सांगण्याची गरज नाही. आजचे सुजाण विद्यार्थी याची जाणीवपूर्वक दखल घेतील.

७. या कॉलेजचा विद्यार्थी नेसलेल्या कोणत्याही व्यक्तीस परवानगीशिवाय कॉलेज आवारात वा इमारतीत परस्पर प्रवेश करता येणार नाही.

८. आजच्या विद्यार्थ्यांकडून भाषा-ज्ञानाची हेळसांड होत आहे यावर एक साधा सोपा उपाय म्हणजे विद्यार्थ्याजवळ वर्गात मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांची क्रमिक पुस्तके जवळ असणे आवश्यक आहे.

९. ग्रंथालयातील पुस्तके/मासिके यातील पाने काढली किंवा खराब केली किंवा शाई अथवा पेन्सिलने लिखाण केले तर त्या पुस्तकाची किंवा मासिकाची नवीन प्रत किंवा ग्रंथालयाच्या नियमानुसार दंड व विलंब शुल्क आकारण्यात येईल.

१०. के एम.टी. व एस.टी पासचा गैरवापर करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल.

विद्यार्थी मित्रांनो नियमांची यादी तशी कितीही वाढविता येईल प्रश्न आहे तो स्वयंस्फुर्त शिस्त पालनाचा तोच आमच्या महाविद्यालयाचा ध्यास आहे.

महाविद्यालयाच्या आवारात धुम्रपान करणे, मावा व गुटखा सेवन करणे कायद्याने गुन्हा आहे. धुम्रपान करणारा मावा व गुटखा खाणारा विद्यार्थी आढळल्यास त्याच्यावर कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात येईल.

वरील नियमांत बदल करण्याचा अथवा नवे नियम तयार करण्याचा पदसिध्द अधिकार प्राचार्यांना आहे.

**परीक्षा व मूल्यमापन पद्धती :**

सत्र परीक्षा व मूल्यमापन पद्धतीविषयी त्या त्या विषयाचे शिक्षक सत्राच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना वर्गात माहिती देतील. शिवाय कार्यालयामधील याबाबतची सविस्तर निवेदने, परीक्षेच्या संदर्भात सूचना व वेळापत्रक काच फलकात लावले जाते. विद्यापीठाकडून परीक्षेसंदर्भात आलेली माहिती वेळोवेळी शिक्षक व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणली जाते. महाविद्यालयात स्वतंत्र परीक्षा नियंत्रण समिती असून परीक्षेबाबत मार्गदर्शन केले जाते व विद्यार्थ्यांची काही तक्रार असल्यास त्याचे निवारण करण्याची जबाबदारी समितीची आहे.

## Instructions to the Students

1. Every Student should see the complete syllabus prescribed for the concerned course and take note of all rules and regulations.
2. Attendance of minimum 75% is essential (Please refer ordinances 30 to 37)
3. Students shall follow all the rules and regulations of the University and college thereof.
4. The results of the University examinations are available at 12525 for B.S.N.L. Landing and Mobile holders. The students can obtain printed copy of their statement of marks from University Website, which can be used for the purpose of verification of marks and to obtain the xerox copy of accessed answer book.
5. Students can avail the facility of revaluation after getting a Xerox copy of the assessed answer book or verification of the marks.
6. The students having confidence to have change in result due to verification or revaluation can take provisional admission subject to confirmation of change in result due to verification or revaluation.
7. The rules and regulations are available at the University website www.unishivaji.ac.in Important, frequently referred rules are sent to the colleges in the printed booklet prepared by the four sections of the University.
8. Students should complete all requirements of the course in due course of time.
9. Students should use only blue ink for all examination works except where otherwise permitted to use the other ink.
10. The present intake for the certified courses of B..and B.Com. is 120 students per division. For other courses intake is22 mentioned in the certificate.
11. For grant-in-aid courses the tuition fee for B.. Rs. 800/- B.Com Rs. 800/- in additional laboratory fees Rs.125/-. The

fees for professional courses shall be applicable as fixed by Shulka Nirdhar an Samittee or University.

12. Examination calender for the University Examination is to be declared in the first week of July for complete year 20.05.16 and student should verify the same. If there is any change required should communicate it within fifteen days.
13. Separate Certificate will be issued by the University for additional course, if that course is to be started from the academic year 2017-18 to 2019 20.
14. University is not responsible for any loss or otherwise if a student takes admission to any course other than those approved by University.
15. Every student must posses the necessary student Identity Card issued by the respective college.
16. Every student should be a member of student Insurance Scheme.
17. Money/Fee is to be sent to University in DD form payable to Finance ccounts Officer
18. Take benefit of Career oriented Courses and Lead College Scheme activities.
19. The students parents, citizens shall visit the University website www.unishivaji.ac.in

№ 000675

## SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

# CERTIFICATE

This is to certify that University approval is given to ***Yashwantrao Chavan (K.M.C.) Mahavidyalaya, Kolhapur*** to conduct the following courses for the academic year 2019-20.

### ARTS, SOCIAL SCIENCE & COMMERCE FACULTY

**BA-I Grant-in-aid Division-2**

| | | |
|---|---|---|
| **Govt. Approval** | - | एनजीसी/१०९५/(पुकआ)/अनु./मवि-३, दिनांक-१६/०२/१९९६ |
| **University Recent Approval** | - | संलग्नता/टी-२/KOP 26/विद्यापरिषद विषय क्र.३४/ दि. १०/०४/२०१९/१०६२/दि. १५ मे, २०१९ |
| **Compulsory** | - | इंग्रजी, मराठी, हिंदी, एस.टी.डी. |
| **Optional** | - | इंग्रजी, मराठी, हिंदी, इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, शारिरीक शिक्षण, अर्थशास्त्र. |

**BA-II Grant-in-aid Division-2**

| | | |
|---|---|---|
| **Govt. Approval** | - | एनजीसी/१०९५/(पुकआ)/अनु./मवि-३, दिनांक-१६/०२/१९९६ |
| **University Recent Approval** | - | संलग्नता/टी-२/KOP 26/विद्यापरिषद विषय क्र.३४/ दि. १०/०४/२०१९/१०६२/दि. १५ मे, २०१९ |
| **Compulsory** | - | इंग्रजी, पर्यावरणअभ्यास, आय.डी.एस- तर्कशास्त्र, एच.एस.आर.एम., सार्वजनिक प्रशासन, चिटणीसाचा व्यवसाय |
| **Optional** | - | इंग्रजी, मराठी, हिंदी, इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र |

**BA-III Grant-in-aid Division-1**

| | | |
|---|---|---|
| **Govt. Approval** | - | पुकेएस/-१०९०/४६४२/विशी-२, दिनांक-२१/०१/१९९२ |
| **University Recent Approval** | - | संलग्नता/टी-२/KOP 26/विद्यापरिषद विषय क्र.३४/ दि. १०/०४/२०१९/१०६२/दि. १५ मे, २०१९ |
| **Compulsory** | - | इंग्रजी |
| **Optional** | - | इंग्रजी, मराठी, हिंदी, इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल, अर्थशास्त्र. |

**B.Com.-I Grant-in-aid Division-1**

| | | |
|---|---|---|
| **Govt. Approval** | - | पुकेएस/-१०८९/४६४१/विशी-२, दिनांक-२१/०१/१९९२ |
| **University Recent Approval** | - | संलग्नता/टी-२/KOP 26/विद्यापरिषद विषय क्र.३४/ दि. १०/०४/२०१९/१०६२/दि. १५ मे, २०१९ |
| **Compulsory** | - | बिझनेस कम्युनिकेशन-१ (इंग्रजी आवश्यक), फायनान्शियल अकौंटिंग, बिझनेस इकॉनॉमिक्स-१, प्रिन्सीपल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट. |
| **Optional** | - | प्रिन्सीपल ऑफ मार्केटिंग, इन्शुरन्स. |

Registrar,
Shivaji University
Kolhapur

## SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

№ 000676

2

**B.Com.-II Grant-in-aid Division-1**

| | | |
|---|---|---|
| **Govt. Approval** | - | युकेएफ/-१०९०/४६४२/विशी-२, दिनांक-२१/०१/१९९२ |
| **University Recent Approval** | - | संलग्नता/टी-२/KOP 26/विद्यापरिषद विषय क्र.३४/ दि. १०/०४/२०१७/१०६२/दि. १५ मे, २०१७ |
| **Compulsory** | - | बिझनेस कम्युनिकेशन-२ (इंग्रजी आवश्यक), बिझनेस इकॉनॉमिक्स-२, कार्पोरेट अकौंटिंग, पर्यावरणअभ्यास, बिझनेस स्टॅटिस्टिक्स, फंडामेंटल ऑफ इंटरप्रिनरशिप,मनी अँण्ड फायनान्शियल सिस्टिम. |

**B.Com.-III Grant-in-aid Division-1**

| | | |
|---|---|---|
| **Govt. Approval** | - | युकेएफ/-१०९०/४६४२/विशी-२,दिनांक-२१/०१/१९९२ |
| **University Recent Approval** | - | संलग्नता/टी-२/KOP 26/विद्यापरिषद विषय क्र.३४/ दि. १०/०४/२०१७/१०६२/दि. १५ मे, २०१७ |
| **Compulsory** | - | कार्पोरेट डेव्हलपमेंट, बिझनेस रेग्युलेटिंग फ्रेमवर्क, मॉर्डन मॅनेजमेंट सिस्टीम, बिझनेस इन्व्हॉयरमेंट. |
| **Optional / Special** | - | ॲडव्हान्स अकौंटींग ॲण्ड ऑडीटींग पेपर क्र. १ व २<br>ॲडव्हान्स बँकिंग पेपर क्र. १ व २<br>औद्यो.व्यवस्थापन पेपर. क्र.१ व २. |

----- * * * -----

**Place : KOLHAPUR** 5704 -

**Date :** - 6 JUN 2019

Registrar,
Shivaji University,
Kolhapur